३५०-प (149)

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला,
एक्सप्रेस टावर्स,
नरिमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२१.

दूरध्वनी : २०२ ६२४९
२०२ ५३५४
२८३ ५२४७
फॅक्स : २०२ ९३४८
एस.टी.डी : ०२२
ग्राम : पाणी मंडळ, मुंबई.

क्र.मजीप्रा/सस/तांशा-१/३५०/ ६३८ दिनांक ४ मार्च, १९९९.

## परिपत्रक क्र.१४

विषय : निविदांसाठी पूर्व अर्हता ठरवितांना ठेकेदाराच्या कंपनीचे निव्वळ आर्थिक मूल्य (NET WORTH ) विचारांत घेण्याबाबत.

राज्यांतील ग्रामीण व नागरी भागांतील पिण्याच्या पाण्याची समस्या सोडविण्याच्या दृष्टीने शासनाने महत्वाकांक्षी कार्यक्रम हाती घेतला आहे. या कार्यक्रमांतर्गत नागरी व ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या निविदा बोलावण्याची प्रक्रिया ही वेगाने चालू आहे. योजनांची कामे वेगाने व गुणात्मक दृष्ट्या चांगली होण्यासाठी निविदा सुयोग्य व सक्षम ठेकेदारांनीच भराव्यात म्हणून प्राधिकरणांकडील रु.३ कोटीपेक्षा जास्त किंमतीच्या निविदांसाठी ठेकेदारांनी योग्य वर्गात नोंदणी, पूर्वी केलेल्या कामांचा अनुभव व बीड कपॅसिटी इ.अटी पूर्ण करणे अनिवार्य करण्यांत आले आहे. या अटीमुळे सक्षम व अनुभवी ठेकेदारांची निवड होण्यास निश्चितच मदत होते. मात्र या अटीमध्ये ठेकेदाराच्या कंपनीची आर्थिक सक्षमता विचारांत घेतली जात नाही. त्यामुळे रु.२५ कोटी पेक्षा जास्त खर्चाच्या निविदांबाबत हा विचार व्हावा म्हणून कंपनीच्या ''निव्वळ आर्थिक मूल्याचा'' (NET WORTH ) विचार करावा असा प्रस्ताव दि.९.१२.९८ रोजी झालेल्या निविदा समितीच्या ११ व्या सभेत सादर करण्यांत आला होता. व त्या प्रस्तावांस निविदा समितीने मंजुरी दिली. त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे सूचना देण्यांत येत आहेत.

प्राधिकरणांकडून बोलावण्यांत येणा-या निविदांची अंदाजित किंमत (cost put to Tender) जर रुपये २५ कोटी अथवा त्यापेक्षा जास्त असेल तर अशा सर्व नागरी व ग्रामीण पाणी पुरवठा व मलनि:सारण योजनांच्या कामांच्या निविदांसाठी ठेकेदाराचे निव्वळ आर्थिक मूल्य (NET WORTH) तपासून ठेकेदाराची पूर्व अर्हता ठरवावी.

चार्टर्ड अकाउंटंटकडून प्रमाणित करण्यांत आलेल्या आर्थिक ताळेबंदानुसार सदर ठेकेदार घेऊ इच्छित असलेले काम ज्या आर्थिक वर्षात येते त्या वर्षीच्या आधीच्या सलग तीन वर्षाचे सरासरी आर्थिक मूल्य निविदेतील कामाच्या किंमतीच्या किमान २५% असणे आवश्यक आहे. वरील प्रमाणे याबाबतची अट रु.२५ कोटीपेक्षा जास्त किंमतीच्या निविदांमध्ये अंतर्भूत करण्यांत यावी.

या अटीबाबत सर्व मुख्य अभियंत्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रांतील क्षेत्रीय अधिकारी व संबंधित ठेकेदारांना आवश्यक त्या सूचना द्याव्यात.

राजेंद्र सगणे
( राजेंद्र सगणे )
सदस्य सचिव (तांत्रिक)

प्रत : मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.

२

147

मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अुपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, नगरविकास, तथा प्राधिकरणाचे अुपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्राधिकरणाचे सर्व सदस्य (नावाने)
सर्व मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
सर्व अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ,
सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग.

M. J. P.
ISSUED
5 MAR 1999
MUMBAI-21.